# जरांगे यांच्या समर्थनार्थ निघालेल्या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी / प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्या सरकारने मान्य कराव्यात यासाठी जानेवारी महिन्यात मनोज जरांगे पाटील आपल्या लाखो सहकार्यांसह मुंबईत धडकले तेव्हा मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र सरकारच्या वतीने जवळपास सर्व मागण्या मान्य केल्या त्यांच्या हस्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले व आंदोलन स्थगित केले.

सगे सोयरे यांना जात दाखले देण्याचा अध्यादेश काढला त्याचे कायद्यात रूपांतर व्हावे तसेच अंतरवाली सराटीसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आरक्षण आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत, सरकारने मराठा समाजास दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवावे यासाठी मागणी साठी जरांगे पाटील गेल्या पाच दिवसापासून अन्न पाण्याचा त्याग करून आमरण उपोषण करत आहेत तसेच त्यांनी औषधोपचार सुद्धा नाकारलेला आहे यासाठी त्यांना पाठिंबा म्हणून पिंपरी चिंचवड शहरात दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, निघालेल्या दुचाकी रॅलीची सुरवात डांगे चौक थेरगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून तसेच अभिवादन करून करण्यात आली. सदर रॅली डांगे चौक, काळेवाडी फाटा, रहाटणी, पिंपरीगाव मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथे आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिराव फुले यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर रॅली चिंचवड स्टेशन, आकुर्डी, निगडी मार्गे भक्ती शक्ती समूह शिल्प येथे आली. यावेळी पिंपरी चिंचवड शहर व मावळ तालुक्यातील सकल मराठा समाजाचे हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. समूह शिल्पास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळेस प्रकाश जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व रॅलीचा समारोप करण्यात आला. जीवन बोराडे व मावळ तालुका सकल मराठा समन्वयक मुरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. रॅली यशस्वी करण्यासाठी सतिश काळे, प्रकाश जाधव, सचिन बारणे, मारूती भापकर, सुनिता शिंदे, वैभव जाधव, मीरा कदम, गणेश देवराम, गणेश भांडवलकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



## थोडक्यात

### दोन वर्षीय प्रवाशी बालिकेचा मृत्यू

**शिक्रापूर :** शिरुर बस स्थानक येथे ईश्वर भील हे त्यांच्या पत्नी व दोन लहान मुली या कुटुंबियांसह गावी जाण्यासाठी चौफुला येथून एका एस टी बस मधून आलेले होते, सदर एस टी मधून खाली उतरुन पुन्हा दुसऱ्या बसमध्ये बसण्यासाठी ईश्वर भील एस टी मधून खाली उतरले त्यावेळी त्यांची दोन वर्षीय लहान मुलगी बेशुद्ध पडल्याचे दिसून आले, दरम्यान तिला उपचारासाठी शिरुर ग्रामीण रुग्णालयात नेले आसरा डॉक्टरांनी रंजना ईश्वर भील वय २ वर्षे सध्या रा. वरवंड ता. दौंड जि. पुणे मूळ रा. शिरपूर वाघाडी ता. शिरपूर जि. धुळे या बालिकेचा मृत्यू झाल्याचे घोषित केले, याबाबत ईश्वर भाईदास भील वय ३१ वर्षे सध्या रा. वरवंड ता. दौंड जि. पुणे मूळ रा. शिरपूर वाघाडी ता. शिरपूर जि. धुळे यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने शिरुर पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक प्रताप टेंगले हे करत आहे.

### शिवनेरी बसची मालवाहू ट्रकला धडक

**किवळे :** भरधाव वेगात असलेल्या शिवनेरी बसने एका मालवाहू ट्रकला मागून धडक दिली. मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर किवळे येथे बाहेर पडतात. बसमध्ये एकूण २६ प्रवासी होते. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. या अपघातामुळे एक्स्प्रेस वेच्या या पॅचवर वाहतूक कोंडी झाली होती. अपघातादरम्यान मालवाहू ट्रक पलटी झाला. तसेच शिवनेरी बसचेही मोठे नुकसान झाले आहे. ही बस प्रवाशांना घेऊन ठाण्याहून स्वारगेटला जात होती. ट्रकमध्ये प्लास्टिकच्या लगद्याचा माल होता. मालवाहू ट्रक सांगलीच्या दिशेने जात होता. तीव्र उतारामुळे बस चालकाला वेगावर नियंत्रण ठेवता आले नाही. त्यामुळे हा अपघात झाला. अपघातानंतर एक्स्प्रेस वेच्या पुणे लेनवर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. महामार्ग राज्य पोलिस व रावेत पोलिसांच्या मदतीने महामार्गावर अपघातग्रस्त वाहन हटविण्याचे काम सुरू आहे.

# भाजपकडून पैसा व दबावतंत्र वापरून आमदार फोडण्याचे काम सुरू : आ. रोहीत पवार

**निरगुडसर / प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील शेतकरी यांना गेले साडेतीन वर्षापासून हिरडा नुकसान भरपाई अद्याप मिळाली नसून ज्याप्रमाणे या शेतकऱ्यांचे झाड निहाय पंचनामे झाले त्याचप्रमाणे त्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केले आहे. आदिवासी बांधवांना हिरडा नुकसान भरपाई मिळावी या मुख्य मागणीसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने गुरुवार दिनांक १५ रोजी उपविभागीय कार्यालय मंचर येथे बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले असून या आंदोलनाला आमदार रोहित पवार यांनी भेट दिली यावेळी ते बोलत होते.




यावेळी ते म्हणाले की किसान सभेने सुरू केलेल्या उपोषणास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार यांच्या पक्षाने जाहीर पाठिंबा दिला असून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहू हिरड्याचा प्रश्न गेल्या तीन साडेतीन वर्षापासून प्रलंबित असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी ताकदीने प्रयत्न झाले नाही. झाड निहाय पंचनामे करून आता आता हेक्टरी नुकसान भरपाई देऊ असे सांगितले जात आहे त्यामुळे शेतकऱ्यांना कमी पैसे मिळणार आहेत. ज्या प्रकारे पंचनामे झाले आहे त्याप्रमाणे नुकसान भरपाई मिळावी सरकार नको त्या ठिकाणी पैसे वाया घालवत असून ज्या ठिकाणी गरज आहे तेथे हात आखडता घेत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी फोडाफोडीचा राजकारणाबाबत रोहित पवार यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की भाजपकडे पैसा व दबावतंत्र असल्याने विविध पक्षातील आमदारांना फोडण्याचे काम सूरू असून पुढील काळात अनेक आमदारांना संपर्क केला जाणार आहे. जे विचारांना बांधील नाहीत, ज्यांनी चुका केल्या आहेत ते भाजप बरोबर जातील, मात्र जे विचारांना, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला व जनतेला बांधील आहेत ते मात्र आहे त्या ठिकाणी राहतील आदरणीय शरद पवार यांच्याबरोबर असलेले सर्वजण त्यांच्याबरोबरच राहतील असेही यावेळी रोहित पवार म्हणाले.

# बिबट सफारीला मंजुरी व निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली : शरद सोनवणे

**जुन्नर / प्रतिनिधी**

बिबट सफारी बाबत त्या काळात मुख्यमंत्री (उद्धव ठाकरे) व पर्यटन मंत्री यांनी दखल घेतली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बिबट सफारीला मंजुरी व निधी प्राप्त केला.

असे आदिवासी दुर्गम भागात देवळे येथील महिला मेळावा प्रसंगी शिवसेनेचे माजी आमदार शरद सोनवणे यांनी याप्रसंगी सांगितले व माजी आमदार सोनवणे पुढे म्हणाले या भागात पहाटे सहा ते सायंकाळी सात वाजेपर्यंत येथील शेतकरी शेतात काम करत असतात. येथील ढाकळढोरे धरणाचा सर्वे करणे गरजेचे आहे. माझ्या आमदारकीच्या काळात बुडीत बंधाऱ्याचे सर्वे झाले ,पुढे काही झाले नाही. बुचकेवाडी -- सुकाळवेढे मार्गे भीमाशंकर ला जोडणारा रस्ता झाला तर भीमा शंकराची फार मोठी कृपा होईल. दाऱ्या घाट बाबत १९६० पासून स्वप्न पाहत असून सन २०१७ मध्ये सर्वे झाला आहे. डी पी आर सुद्धा तयार केला असून ठाण्याला पंचावन्न किलोमीटर मध्ये पोहोचता येईल . त्यामुळे येथील दर्या घाट झाला तर आदिवासी भागात नंदनवन फुलणार आहे. या विविध या भागातील समस्या आमदार शरद सोनवणे यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे मागण्या केल्या. या आदिवासी भागामध्ये धरण झाली . या धरणाच्या पाण्याचा फायदा नगर व पुढील भागांना होतो पण येथील धरण क्षेत्रातील आदिवासी बांधवांना पाण्यासाठी भर उन्हाळ्यात फिरावे लागत आहे. असे सरपंच दत्ता गवारी यांनी आपल्या भावना यावेळी व्यक्त केल्या.

### सोळू आग दुर्घटनेत जखमींचा मृत्यू

आळंदी : सोळू (ता. खेड) येथील गावातअल्युमिनियम प्लेट तयार करणाऱ्या कारखान्यात गुरुवारी ( दि. ८) भीषण स्फोट झाला होता. या स्फोटात आज पर्यंत पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या शिवाय १७ जखमींवर विविध खाजगी रुग्णालयांत आणि पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरु आहेत. संतोष त्रंबक माने, नवनाथ पांचाळ या दोघांचा घटनेच्या दिवशी, ९ फेब्रुवारी रोजी रामचंद्र मारुती निंबाळकर यांचा तर नंदा शेळके यांचा १० फेब्रुवारी रोजी मृत्यू झाला.


## जाहीर निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत अभियंता व त्या वर्गातील कंत्राटदारांना कळविणेत येते कि इंदापूर तालुक्यातील मौजे म्हसोबाचीवाडी ग्रामपंचायत अंतर्गत खालील ठिकाणी कामे हाती घेणेत आलेली असून सदरची कामे कारणेकामी नमूद केलेल्या वर्गातील कंत्राटदाराकडून बी १ निविदा मागविनेत येत असून सदर काम करणारे त्या वर्गातील कंत्राटदार यांनी सदरच्या निविदा ग्रामपंचायत म्हसोबाचीवाडी ता. इंदापूर, जिल्हा-पुणे, येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १६/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात दोन प्रतीत (तांत्रिक व आर्थिक) बंद लिफाफ्यात सादर कराव्यात सदर निविदा दिनांक २३/०२/२०२४ रोजी सकाळी ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक/सरपंच यांचेसमोर ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील कोरे निविदा अर्ज ग्रामपंचायत कार्यालय म्हसोबाचीवाडी येथे विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घ्यावे कोरे निविदा फी ग्रामपंचायत म्हसोबाचीवाडी PDCC बँक शाखा शेटफळ गढे खाते क्रमांक 13002500000014 वर किंवा ग्रामपंचायत मध्ये रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील इसारा रक्कम व कोरे अर्ज निविदा फी जमा केलेली पोहच तांत्रिक लिफाफा मध्ये जमा करावी सुरुवातीला तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल व आपली निविदा सर्व नियमास पात्र झालेनंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल जे ठेकेदार तांत्रिक लिफाफा मध्ये अपात्र होतील त्यांचा आर्थिक लिफाफा उघडण्यात येणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कोरे अर्ज निविदा फी | इसारा रक्कम | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीय वस्तीत रस्ता करणे. | १८७००५/- | २३६/- | १% | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| २ | पाण्याची टाकी कट्टा बांधणे. | ९०९०१/- | २३६/- | १% | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |

**आवश्यक कागदपत्रे :-** **१)** नोंदणी प्रमाणपत्र, **२)** जी. एस. टी नोंदणी प्रमाणपत्र, **३)** PAN कार्ड, **४)** कामाच्या अनुभवाचा दाखला, **५)** मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (ITR) टीप:- निविदा संधर्भातील कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे व इतर सर्व अधिकार सरपंच ग्रामसेवक ग्रामपंचायत म्हसोबाचीवाडी ता. इंदापूर, जिल्हा-पुणे. यांनी राखून ठेवले आहेत.

**सही/-**
**ग्रामसेवक/सरपंच**
**ग्रामपंचायत म्हसोबाचीवाडी**
**ता. इंदापूर, जि. पुणे.**



**एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड**
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
**नोंदणीकृत कार्यालय:** नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

## तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 12.02.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. राम शंकर मौर्या 2. निशादेवी राम मौर्या | मालत्तेचा तपशील – फ्लॅट नं 701, क्षेत्रफळ 27.02 चौरस मीटर्स चटई क्षेत्रफळ त्यासोबत एनक्लोज बाल्कनी जिचे क्षेत्रफळ 3.00 चौरस मीटर्स आहे आणि पुढे एकत्रितपणे संलग्न बाल्कनी 0.00 चौरस मीटर्स आणि पुढे टेरेस जिचे क्षेत्रफळ 1.52 मीटर्स आहे, जे सातवा मजला, बिल्डिंग नं. "A5", जिचे नाव "Xrbi Ambi - Ph-I, गाव अंबी, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र, भारत 410507 इथे आहे | MUMHL18001746 आणि MUMHL18001747 | 19.01.2024 | रु. 1,60,816/- | रु. 26,50,276.51/- | रु. 16,08,160/- | 21-03-2024 | 28-03-2024 |
| 1. बोने लक्ष्मण विलासराव 2. बोने सुनीता लक्ष्मण | मालमत्तेचा तपशील – फ्लॅट नं 508, क्षेत्रफळ 25.94 चौरस मीटर्स चटई क्षेत्रफळ, त्यासोबत एक एन्क्लोज्ड बाल्कनी आहि जिचे क्षेत्रफळ चौरस 0.00 मीटर्स आहे आणि त्यासोबत संलग्न बाल्कनी 5.37 स्क्वेअर मीटरसह आणि पुढे, इमारत क्रमांक "B1" मध्ये, Xrbia निवासस्थान, गाव जांभूळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे, म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाचव्या मजल्यावरील खुल्या टेरेसच्या अनन्य हक्कासह. महाराष्ट्र भारत 410506 (गट क्रमांक 240) | H00535191219103259/ H00535191219103259L/ H00535191219103259G | 19.01.2024 | रु. 1,23,920/- | रु. 23,73,148.86/- | रु. 12,39,200 | 21-03-2024 | 28-03-2024 |
| 1. सोमवीर 2. संतोष कुमारी | मालमत्तेचा पत्ता – फ्लॅट नं. D1-101 क्षेत्रफळ 36.23 चौरस मीटर्स चटई क्षेत्र आणि एनक्लोज्ड बाल्कनी सोबत जिचे क्षेत्रफळ 7.65 चौरस मीटर्स आहे आणि त्यासोबत 0.00 चौरस मीटर्सची जोडलेली बाल्कनी आहे आणि दोन्ही मिळून आय लेवलवर ओपन टेरेसचा खास अधिकार आहे जे क्षेत्रफळ 5.79 चौरस मीटर्स आहे, जे पहिल्या मजल्यावर, इमारत क्रमांक. D1 मध्ये असून ह्या इमारतीला ''Xrbia Eifeel City-PH-I'' असे म्हणतात, जी गट नं. 1527/2, तळेगाव रोड, चाकण, महाराष्ट्र 410501 येथे आहे. | H16870200719035003 आणि H16870200719035003L | 22.01.2024 | रु. 3,83,650/- | रु. 29,38,407.13/- | रु. 38,36,500 | 21-03-2024 | 28-03-2024 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **27/03/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **28/03/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **29/03/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव – शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. – ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. – ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 16.02.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड



**एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड**
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

## ताबा सूचना

[नियम-8(1)]

जसे की, खालील स्वाक्षरी करणार एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचा (आधीचे नाव: एल्&टी हाउसिंग फायनान्स लि. ही एल्&टी हाउसिंग फायनान्स लि. सोबत विलीन झाली आहे (एकत्रीकरणाच्या योजने अंतर्गत ज्याला एनसीएलटी मुंबई आणि एनसीएलटी कोलकाता ह्यांनी मान्यता दिली आहे, दिनांक 12 एप्रिल 2021 पासून एल्&टी फायनान्स लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता एल्&टी फायनान्स लिमिटेड ही दिनांक 4 डिसेंबर 2023 पासून एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस आणि एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, 2002 [नियम 3] सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13(12) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून एक मागणी सूचना जारी केली असून त्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना सदर सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांचे आत खाली नमूद करण्यात आलेल्या मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम व मागणी सूचनेच्या तारखेपासून ते पैसे भरेपर्यंत/वसूल होईपर्यंत त्यावरील अधिक व्याज आणि इतर शुल्क इतक्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे ह्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना आणि सर्वसाधारण जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खालील स्वाक्षरी करणार यांनी ह्या सूचने संदर्भात सदर नियम कमल 8 सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13 अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

| कर्ज खाते क्रमांक | कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्सचे नाव | गहाण मालमत्तेचा तपशिल | मागणी सूचना दिनांक | मागणी सूचना थकित रक्कम (₹) | ताबा घेतल्याची तारीख व प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| H16622310720042401 & H16622310720042401L & H16622310720042401G | 1. महेश मांझी 2. रिना महेश मांझी | मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: – फ्लॅट क्रमांक 406, चौथ्या मजल्यावर 33.51 चौ.मी. चटई क्षेत्र मोजणारे, इमारत क्रमांक B6 मध्ये, "Xrbia हिंजवडी रोड – PH – ii या नावाने ओळखले जाणारे संलग्न बाल्कनी 2.85 चौ.मी. आणि पुढे 1.76 चौ.मी.ची संलग्न बाल्कनी सोबत आणि 1.89 चौ.मी.च्या खुल्या टेरेस क्षेत्राचा विशेष अधिकार, गाव बेबडोहळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र भारत 410406 (गट क्रमांक 1 व 3) | 08-07-2023 | 05-07-2023 रोजी रु. 25,10,085.52/- | 12-02-2024 प्रत्यक्ष ताबा |

कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदारांना विशेषतः आणि सामान्य जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये, आणि मालमत्तेतील कोणताही व्यवहार L&T Finance holdings Limitedच्या मागणीच्या नोटिसमध्ये एकत्रित नमूद केलेल्या रकमेच्या शुल्काच्या अधीन असेल. डिमांड नोटिसच्या तारखेपासून पेमेंट/वसुली होईपर्यंत पुढील व्याज आणि इतर शुल्कांसह.

**दिनांक:** 16.02.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड

Marathi Ad for Pune - Size: 16cms (w) by 11cms (h)


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com